Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

नामदेव ढसाळ यांचे कादंबरीलेखन: एक संशोधनात्मक अभ्यास

दादाराव शिवाजी गायकवाड
संशोधन विद्यार्थी, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Manuscript ID:
JRD -2026-180755
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 263-267
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

नामदेव ढसाळ हे मराठीतील प्रसिद्ध विद्रोही कवी, विचारवंत आणि दलित चळवळीतील महत्त्वाचे कार्यकर्ते होते. ते मुख्यतः कवी म्हणून प्रसिद्ध असले तरी त्यांनी कादंबरीलेखनही केले. हाडकी हाडवळा (१९८१) आणि निगेटिव्ह स्पेस (१९८७) या त्यांच्या दोन महत्त्वाच्या लघुकादंबऱ्या आहेत. या दोन्ही कादंबऱ्यांमधून त्यांनी दलित समाजाचे जीवन, त्यांचे दुःख, संघर्ष, अन्याय आणि बदलाची इच्छा यांचे वास्तव चित्रण केले आहे. 'हाडकी हाडवळा' या कादंबरीत ग्रामीण भागातील महार समाजाचे जीवन दाखवले आहे. जातिभेद, अस्पृश्यता, गरिबी, भूक, वतनव्यवस्था आणि सामाजिक अन्याय या समस्या कादंबरीत दिसतात. बायजा ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. ती गरीब आणि अनेक संकटांनी त्रस्त असली तरी खंबीर आणि धाडसी आहे. आपल्या कुटुंबासाठी आणि मुलाच्या भविष्यासाठी ती सतत संघर्ष करते. तिच्या व्यक्तिरेखेतून दलित स्त्रीचे कष्ट, दुःख, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्धचा विरोध दिसून येतो. या कादंबरीत महारवाड्यातील लोकांचे दैनंदिन जीवन आणि त्यांच्या चालीरीतींचेही चित्रण केले आहे. जत्रा, उरूस, ग्रामदैवते, लोकगीते, ओव्या, श्रद्धा आणि लोकपरंपरा यांचा उल्लेख येतो. त्यामुळे दलित समाजाची संस्कृती आणि जीवनपद्धती समजण्यास मदत होते. कादंबरीची भाषा साधी, ग्रामीण आणि बोली स्वरूपाची आहे. महारी बोली, म्हणी, वाक्प्रचार आणि लोकभाषेचा वापर केल्यामुळे कादंबरीतील वातावरण अधिक जिवंत वाटते. 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबरीत ग्रामीण जीवनाऐवजी मुंबईतील महानगरीय जीवनाचे चित्रण केले आहे. कामाठीपुरा, फोरास रोड, नागपाडा, ग्रँट रोड आणि ताडदेव अशा परिसरांची पार्श्वभूमी कादंबरीत आहे. गुन्हेगारी, बेरोजगारी, गरिबी, वेश्याव्यवसाय, राजकारण, पोलिस व्यवस्था आणि समाजातील अन्याय यांचे चित्रण यात केले आहे. राजा हा या कादंबरीतील प्रमुख पात्र आहे. तो आंबेडकरी विचारांचा आहे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची त्याची भूमिका आहे. मात्र परिस्थितीमुळे तो गुन्हेगारीच्या जगात ओढला जातो. त्याच्या जीवनातून समाजातील गरिबी, बेरोजगारी आणि अन्याय यांचा व्यक्तीच्या आयुष्यावर होणारा परिणाम दिसतो. कादंबरीत आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांतील विचारांचा संवादही आढळतो. जात आणि वर्ग या दोन्ही समस्यांचा विचार सामाजिक बदलासाठी आवश्यक आहे, असा विचार येथे मांडला आहे. जैनी ही निगेटिव्ह स्पेसमधील महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. तिच्या माध्यमातून स्त्रीचे दुःख, स्वातंत्र्य, सन्मान आणि स्वतःच्या आयुष्याबद्दल निर्णय घेण्याची इच्छा यांचे चित्रण केले आहे. त्यामुळे या कादंबरीत स्त्रीच्या अस्तित्वाचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. या कादंबरीची भाषा महानगरीय जीवनाप्रमाणेच विविध प्रकारची आहे. मराठी, हिंदी, उर्दू, बंबय्या बोली आणि गुन्हेगारी जगतातील भाषेचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील वेगवेगळ्या समाजघटकांचे जीवन आणि त्यांची भाषा प्रभावीपणे समोर येते. दोन्ही कादंबऱ्यांची पार्श्वभूमी वेगळी आहे. हाडकी हाडवळामध्ये ग्रामीण दलित जीवन, जातिभेद आणि गरिबी दिसते; तर निगेटिव्ह स्पेसमध्ये मुंबईतील गुन्हेगारी, राजकारण आणि सामाजिक संघर्ष दिसतो. तरीही दोन्ही कादंबऱ्यांमध्ये अन्यायाविरुद्ध संघर्ष, दलित अस्मिता, मानवी स्वातंत्र्य आणि सामाजिक बदलाची इच्छा हा समान विचार आहे. एकूणच, नामदेव ढसाळांचे कादंबरीलेखन हे दलित समाजाच्या जीवनाचे वास्तव चित्रण करणारे आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
दादाराव शिवाजी गायकवाड, संशोधन विद्यार्थी, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

How to cite this article:
गायकवाड दादाराव शिवाजी. (2026). नामदेव ढसाळ यांचे कादंबरीलेखन: एक संशोधनात्मक अभ्यास. Journal of Research and Development, 18(7), 263–267. https://doi.org/10.5281/zenodo.22169026

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.22169026
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून समाजातील जातिभेद, गरिबी, स्त्रीशोषण, अन्याय आणि राजकीय संघर्ष यांवर भाष्य केले आहे. त्यांच्या वेगळ्या भाषाशैलीमुळे आणि वास्तववादी मांडणीमुळे हाडकी हाडवळा आणि निगेटिव्ह स्पेस या कादंबऱ्यांना मराठी दलित साहित्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

मुख्यशब्द: *नामदेव ढसाळ, कादंबरीलेखन, हाडकी हाडवळा, निगेटिव्ह स्पेस, दलित साहित्य, दलित अस्मिता, सामाजिक वास्तव, जातीय विषमता, स्त्रीशोषण, ग्रामीण जीवन, महानगरीय जीवन, आंबेडकरवाद.*

प्रस्तावना

मराठी साहित्यात नामदेव ढसाळ हे मुख्यतः विद्रोही कवी, दलित पँथर चळवळीचे सहसंस्थापक, विद्रोही विचारवंत आणि सामाजिक वास्तवाचे प्रभावी भाष्यकार म्हणून ओळखले जातात. मात्र, त्यांच्या साहित्याचा विचार केवळ कवितेपुरता मर्यादित करता येत नाही. त्यांनी कादंबरी आणि कथालेखनाच्या माध्यमातूनही मराठी साहित्याला महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हाडकी हाडवळा (१९८१) आणि निगेटिव्ह स्पेस (१९८७) या त्यांच्या दोन लघुकादंबऱ्या मराठी दलित कादंबरीच्या विकासातील महत्त्वाच्या साहित्यकृती मानल्या जातात. या कादंबऱ्या आकाराने लहान असल्या तरी त्यामधील अनुभवविश्व, सामाजिक-राजकीय जाणीव, भाषिक वैशिष्ट्ये आणि तात्त्विक विचार यांमुळे त्या मराठी साहित्याच्या अभ्यासात स्वतंत्र स्थान मिळवतात. ग्रामीण दलित जीवन, स्त्रीचे अस्तित्व, जातीय विषमता, दारिद्र्य, महानगरीय जीवन, गुन्हेगारी, राजकीय संघर्ष, आंबेडकरी आणि मार्क्सवादी विचारसरणीतील संवाद, अस्तित्ववादी प्रश्न आणि मानवी स्वातंत्र्याचा शोध अशा अनेक विषयांचा बहुआयामी विचार या कादंबऱ्यांत आढळतो. प्रस्तुत शोधनिबंधात हाडकी हाडवळा आणि निगेटिव्ह स्पेस या दोन्ही कादंबऱ्यांचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, स्त्रीवादी, समाजशास्त्रीय, भाषिक आणि कलात्मक अशा विविध अंगांनी अभ्यास करण्यात आला आहे.

हाडकी हाडवळा

नामदेव ढसाळ यांच्या कादंबऱ्या पारंपरिक कथानकावर आधारित किंवा केवळ मनोरंजन करणाऱ्या नाहीत. त्या अनुभवप्रधान, आत्मपर, सामाजिक वास्तवाशी बांधिल आणि विचारप्रधान स्वरूपाच्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये घटनांपेक्षा मानवी अनुभव, पात्रांचे मानसिक जग, सामाजिक रचना आणि ऐतिहासिक संदर्भ अधिक महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या केवळ साहित्यकृती नसून दलित समाजाच्या इतिहासाचा, सांस्कृतिक स्मृतींचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरतात. ढसाळ यांच्या लेखनात आत्मचरित्रात्मक अनुभव, सामूहिक स्मृती, इतिहास, लोकसंस्कृती आणि विद्रोही जाणीव यांचा परस्परसंबंध दिसून येतो. त्यांच्या वैयक्तिक अनुभवांचे रूपांतर सामूहिक अनुभवात झालेले दिसते. हीच त्यांची साहित्यदृष्टी इतर दलित लेखकांपेक्षा वेगळी ठरते. हाडकी हाडवळा ही मराठी दलित कादंबरीच्या इतिहासातील महत्त्वाची लघुकादंबरी आहे. ही कादंबरी आत्मपर असली तरी तिचा आशय केवळ लेखकाच्या वैयक्तिक अनुभवांपुरता मर्यादित राहत नाही. ती संपूर्ण महार समाजाच्या जीवनसंघर्षाचे प्रतिनिधित्व करते. "हाडकी हाडवळा" ही संज्ञा दलितांच्या ऐतिहासिक परावलंबित्वाची, वतनव्यवस्थेची आणि सामाजिक शोषणाची प्रतीकात्मक अभिव्यक्ती आहे. कादंबरीच्या लेखनामागील भूमिका स्पष्ट करताना नामदेव ढसाळ म्हणतात: "गावगाड्याच्या पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या एकूण व्यवहारात जत्रा, खेत्रा, उरुस, उत्सव, सण, समारंभ यांच्या निमित्ताने स्पृश्य आणि अस्पृश्य ज्या प्रकारे एकमेकांच्या भावजीवनात मिसळून जात, त्याचे नाना अनुभव लहानपणी मी माझ्या जन्मगावी घेतले. या अनुभवांपैकी काहींचे चित्रण म्हणजेच हे आत्मपर लेखन आहे."[१] कादंबरी लेखनाकडे वळण्याची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात: "आत्मचरित्र मी कवितेतून सांगतो. त्यामुळे मी स्पेशली त्याच्यासाठी एक स्पेशल जाडजूड ग्रंथ तयार करावा या मताचा अजिबात नाही. मी कादंबरीकडे कसा वळलो तर माझं बालपण ज्या ग्रामीण भागाशी, ज्या व्यवस्थेशी निगडित होतं ते सगळं अभिव्यक्त करायला कादंबरी मला कवितेपेक्षा जास्त जवळची वाटली."[२] या विधानावरून कविता आणि कादंबरी या दोन्ही अभिव्यक्तिमाध्यमांमधील फरक स्पष्ट होतो. आत्मानुभवाची तीव्रता कवितेत व्यक्त करता येते; परंतु ग्रामीण समाजजीवन, सामाजिक रचना आणि व्यापक अनुभवविश्व मांडण्यासाठी कादंबरी अधिक सक्षम माध्यम असल्याचे ढसाळ मानतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या आत्माविष्कारासोबतच सामाजिक वास्तवाचेही महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरतात.

हाडकी हाडवळाच्या प्रस्तावनेत लेखक आपल्या बालपणातील अनुभवांचे स्वरूप स्पष्ट करतात. महार समाजातील स्त्री-पुरुषांचे जीवन, त्यांचे परस्पर संबंध, सुख-दुःख, संघर्ष, सामाजिक व्यवहार आणि गावजीवनातील अनुभव यांचे वास्तववादी चित्रण या कादंबरीत असल्याचे ते नमूद करतात. त्यामुळे ही कादंबरी केवळ आत्मकथन राहत नाही, तर एका समाजाच्या सामूहिक अनुभवांचे चित्रण करणारी साहित्यकृती बनते. 'हाडकी हाडवळा' या शीर्षकाचाही ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचा आहे. गावसेवेच्या बदल्यात महार समाजाला मिळालेल्या सामूहिक इनामी जमिनीला 'हाडकी हाडवळा' असे म्हटले जात असे. या संज्ञेच्या माध्यमातून दलित समाजाचा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

इतिहास, त्यांची श्रमसंस्कृती आणि गावकी व्यवस्थेतील स्थान अधोरेखित होते. या कादंबरीची प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे **बायजा**. ती केवळ नायिका नसून दलित स्त्रीच्या संघर्षशील जीवनाचे प्रतीक आहे. म्हणूनच ती नायिकाप्रदान कादंबरी आहे. दारिद्र्य, उपासमार, वतनव्यवस्थेचा ऱ्हास, कुटुंबाची जबाबदारी आणि मुलाला शिक्षण देण्यासाठीची तिची धडपड यांमधून दलित स्त्रीचे बहुआयामी जीवन उलगडते. जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेली घुसमट आणि अपमानास्पद जीवनाविषयीचा तिचा संताप हा केवळ तिचा वैयक्तिक अनुभव नसून संपूर्ण दलित समाजाच्या मानसिक अवस्थेचे प्रतिनिधित्व करतो. या कादंबरीचा मुख्य आशय जातीय विषमता आणि सामाजिक शोषण हा आहे. गावातील 'वरचं अंग' आणि 'खालचं अंग' ही विभागणी भारतीय ग्रामीण समाजातील वर्णव्यवस्थेचे वास्तव स्पष्ट करते. दलित मुलांनी विहिरीत पोहल्यामुळे विहीर 'बाटते', सवर्णांच्या शेतात प्रवेश केल्यास मारहाण होते, अशा प्रसंगांमधून अस्पृश्यतेचे अमानुष स्वरूप प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. ढसाळ यांनी या सामाजिक व्यवस्थेवर कोणताही आडपडदा न ठेवता थेट भाष्य केले आहे.दारिद्र्य आणि भूक या कादंबरीतील महत्त्वाच्या समस्या आहेत. बायजाच्या कुटुंबाची उपासमार, जंगलातून सरपण गोळा करणे, तरवड्याच्या भाजीवर दिवस काढणे आणि जगण्यासाठीचा सततचा संघर्ष यांमधून आर्थिक विषमतेचे वास्तव समोर येते. येथे भूक ही केवळ शारीरिक गरज नसून सामाजिक अन्यायाचे प्रतीक म्हणून उभी राहते. दलित स्त्रीचे वास्तववादी चित्रण हे या कादंबरीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. जात, वर्ग आणि लिंग या तिन्ही पातळ्यांवर दलित स्त्रीचे शोषण होत असल्याचे लेखक दाखवतात. बायजावर तिच्याच दिराकडून होणारा लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न हा पितृसत्ताक व्यवस्थेचे वास्तव उघड करणारा प्रसंग आहे. मात्र बायजा त्याला ठामपणे विरोध करते. त्यामुळे ती केवळ दुःख भोगणारी स्त्री न राहता प्रतिकार करणारी, स्वाभिमानी आणि धाडसी स्त्री म्हणून समोर येते.

दलित समाजाचे सांस्कृतिक जीवन

हाडकी हाडवळा या कादंबरीत दलित समाजाचे सांस्कृतिक जीवन अत्यंत जिवंत आणि वास्तववादी पद्धतीने चित्रित केले आहे. महारवाड्यातील दैनंदिन जीवन, बलुतेदारी व्यवस्था, लोकश्रद्धा, काळूबाई, मरीआई, यमाई यांसारख्या ग्रामदैवतांची उपासना, जत्रा, उरूस, पोतराज, बगाड, शिमगा, लोकगीते, ओव्या, नवस, धुपारे आणि विविध लोकपरंपरा यांचे तपशीलवार वर्णन या कादंबरीत आढळते. या वर्णनातून दलित समाजाची सांस्कृतिक अस्मिता स्पष्ट होते. ढसाळ लोकसंस्कृतीचे केवळ गौरवगान करत नाहीत. ते तिच्यातील श्रद्धा, अंधश्रद्धा आणि सामाजिक वास्तव यांचा समतोलपणे विचार करतात. त्यामुळे ही कादंबरी दलित समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरते. या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समूहजीवनाचे प्रभावी चित्रण. गंगड आज्या, मनबा, महारवाड्यातील स्त्री-पुरुष, शेतकरी, सवर्ण आणि इतर अनेक पात्रांच्या माध्यमातून लेखक संपूर्ण गावजीवनाचा विस्तृत पट उभा करतात. प्रत्येक पात्र समाजातील एका विशिष्ट वास्तवाचे प्रतिनिधित्व करते. गंगड आज्याच्या बैलाच्या मृत्यूनंतर त्याच्या मांसाची केलेली वाटणी हा प्रसंग दलित समाजाच्या आर्थिक दारिद्र्याचे आणि त्यांच्या जगण्यातील कठोर वास्तवाचे प्रभावी चित्रण करतो. अशा प्रसंगांमुळे ही कादंबरी समाजशास्त्रीय अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण स्रोत ठरते. रणधीर शिंदे यांच्या मते, "या कादंबरीत मरणानुभवाचे खोलवरचे चित्रण आहे. विविध व्यक्तींची मरणे कादंबरीत आहेत. भूक या मानवी जीवनातील मूलभूत जाणिवांचे प्रकटीकरण त्यात आहे. तसेच दैहिक वासनांचेही चित्रण आहे. तरुण मनबा वडीलधाऱ्या बायजाकडे आकर्षित होतो. त्याच्या मनातील शारीरिक संवेदना, त्यानंतर निर्माण झालेली पापभावना आणि अपराधभाव यांचे अत्यंत प्रभावी चित्रण लेखकाने केले आहे. बायजाची व्यक्तिरेखा कष्टाळू, वात्सल्यपूर्ण, मायाळू, करारी, धाडसी आणि प्रसंगी रौद्र रूप धारण करणारी आहे. त्यामुळे दलित समूहजीवनाचे दर्शन व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून घडते."[३] या कादंबरीत भूक ही केवळ शारीरिक गरज नसून मानवी अस्तित्वाशी निगडित मूलभूत प्रेरणा म्हणून व्यक्त झाली आहे. त्याचबरोबर मानवी दैहिक भावना आणि त्यातून निर्माण होणारा अपराधभाव यांचेही लेखकाने वास्तववादी आणि मानसशास्त्रीय चित्रण केले आहे.

मनबा आणि बायजा यांच्या प्रसंगातून शरीरसंबंधांविषयी समाजातील नैतिक मूल्ये, सांस्कृतिक बंधने आणि स्त्रीशोषणाचे वास्तव समोर येते. त्यामुळे लेखक केवळ सामाजिक घटनांचे चित्रण करत नाहीत, तर व्यक्तीच्या मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अनुभवांचाही सखोल विचार करतात. यामुळे हाडकी हाडवळा ही कादंबरी दलित समूहजीवनाला व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून प्रभावीपणे अभिव्यक्त करणारी महत्त्वपूर्ण साहित्यकृती ठरते. या कादंबरीची भाषा हे तिचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहे. ढसाळ यांनी महारी बोली, ग्रामीण म्हणी, वाक्प्रचार, शिव्या, लोकगीते, ओव्या, देवीची गाणी, फेरादीची गाणी आणि लोककथनशैली यांचा प्रभावी वापर केला आहे. त्यामुळे भाषा ही केवळ संवादाचे साधन राहत नाही, तर दलित समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीची वाहक बनते. तृतीयपुरुषी निवेदनाचा संतुलित वापर कथेला आत्मीयता आणि वस्तुनिष्ठता प्रदान करतो. लेखक मूळतः कवी असल्यामुळे त्यांच्या गद्यातही काव्यात्मता आढळते. निसर्गचित्रण, प्रतिमा, रूपके, लय आणि ध्वनिसौंदर्य यांमुळे कादंबरीची भाषा अधिक प्रभावी आणि संवेदनशील बनते. त्यामुळे वास्तववादी आशयाला कलात्मक उंची प्राप्त होते. हाडकी हाडवळा या कादंबरीविषयी आसाराम लोमटे यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. ते म्हणतात, "एखादे गद्य शैलीदार आणि प्रतिमा-प्रतिकांनी युक्त असेल तर त्याला एक प्रकारची

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

कविताच म्हणण्याची पद्धत आहे. पण 'हाडकी हाडवळा'बाबत तसे म्हणता येत नाही. एका श्रेष्ठ कवीचे हे नितांत सुंदर गद्य आहे. किशोरवयीन सावळाच्या निरागस नजरेतून आणि बायजाच्या संघर्षमय जीवनातून विणलेले हे गद्य अत्यंत प्रभावी आहे. ढसाळांच्या कवितेची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली; परंतु 'हाडकी हाडवळा' या कादंबरीचे योग्य मूल्यमापन झाले नाही."[४] नामदेव ढसाळ यांची गद्यलेखनशैलीही त्यांच्या कवितेइतकीच प्रभावी आहे. मात्र, त्यांच्या कादंबरीलेखनाकडे समीक्षकांनी अपेक्षित तेवढे लक्ष दिले नाही. एकूणच, हाडकी हाडवळा ही केवळ एका दलित कुटुंबाची कथा नाही. ती ग्रामीण समाजातील जातीय विषमता, दारिद्र्य, स्त्रीशोषण, सामाजिक संघर्ष, लोकसंस्कृती आणि मानवी जगण्याचे वास्तव यांचे व्यापक चित्रण करणारी लघुकादंबरी आहे. बायजा या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून नामदेव ढसाळ यांनी दलित स्त्रीचे जिवंत, संघर्षशील आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व प्रभावीपणे उभे केले आहे. त्यामुळे *हाडकी हाडवळा* ही मराठी दलित साहित्याच्या इतिहासातील समाजशास्त्रीय, सांस्कृतिक आणि साहित्यिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाची कादंबरी ठरते.

निगेटिव्ह स्पेस :

हाडकी हाडवळा नंतर नामदेव ढसाळ यांची निगेटिव्ह स्पेस ही लघुकादंबरी १९८७ साली प्रकाशित झाली. ही कादंबरी त्यांच्या अनुभवविश्वाचा पुढील टप्पा दर्शवते. ग्रामीण दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या हाडकी हाडवळाच्या तुलनेत निगेटिव्ह स्पेस महानगरीय जीवनातील गुंतागुंतीचे वास्तव उभे करते. या कादंबरीत मुंबईतील कामाठीपुरा, फोरास रोड, नागपाडा, ग्रँट रोड आणि ताडदेव या परिसरांचे वास्तववादी चित्रण आढळते. गुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, स्मगलिंग, जुगार, मटका, गँगवॉर, पोलिस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था यांचा परस्परसंबंध लेखकाने प्रभावीपणे दाखवला आहे. त्यामुळे ही कादंबरी मुंबईच्या सामाजिक रचनेचा अभ्यास करणारा साहित्यिक दस्तऐवज ठरते. या कादंबरीचा केंद्रबिंदू म्हणजे राजा ही व्यक्तिरेखा. तो आंबेडकरी विचारांवर निष्ठा असलेला आणि अन्यायाविरुद्ध लढणारा तरुण आहे. दलित पँथरच्या प्रभावातून उभी राहिलेली 'ब्लॅक पँथर' ही संघटना कादंबरीत दिसते आणि राजा तिचा प्रमुख म्हणून कार्य करतो. राजाने फाईन आर्ट्सचे शिक्षण घेतलेले असते; परंतु त्याच्या आयुष्यात सलग दुःखद घटना घडतात. माथाडी कामगार असलेले त्याचे वडील अपघातात मृत्युमुखी पडतात आणि काही दिवसांतच आईही निधन पावते. या दुहेरी आघातामुळे राजाचे आयुष्य विस्कळीत होते. आत्या त्याचा सांभाळ करते; पण तो मानसिकदृष्ट्या खचतो आणि शिक्षण अर्धवट सोडतो. या काळात त्याचा मित्र लंबू त्याला आधार देतो. लंबूच्या माध्यमातून राजाची ओळख माधोभाईशी होते आणि त्याला काम मिळते. इथून त्याच्या आयुष्याला वेगळे वळण मिळते. परिस्थितीमुळे तो गुन्हेगारी जगतात ओढला जातो. पुढे लंबूवरील संशय दूर करण्यासाठी राजा माधोभाईचा खून करतो. अटकेनंतर नगरसेवक मेहता त्यांची सुटका करून घेतो आणि स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करतो. यानंतर 'ब्लॅक पँथर' ही संघटना गुन्हेगारी जगतात प्रभावी बनते.

या कथानकातून ढसाळ गुन्हेगारीची सामाजिक कारणे शोधतात. समाजातील विषमता, बेरोजगारी, अन्याय, दारिद्र्य आणि शासनाची उदासीनता यांमुळे अनेक युवक गुन्हेगारीकडे वळतात, असे लेखक सूचित करतात. त्यामुळे गुन्हेगार व्यक्तीपेक्षा त्यामागील सामाजिक व्यवस्था अधिक जबाबदार असल्याचा दृष्टिकोन कादंबरीत दिसतो. निगेटिव्ह स्पेसचा मुख्य गाभा म्हणजे आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांतील तात्त्विक संवाद. कॉ. दिघे आणि राजा यांच्या चर्चांमधून भारतीय डाव्या चळवळीच्या मर्यादा, जात आणि वर्ग यांचे संबंध, सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप आणि दलित राजकारणाचे प्रश्न समोर येतात. ढसाळ कोणत्याही विचारसरणीचा अंध पुरस्कार करत नाहीत. ते मार्क्सवादाच्या भारतीय संदर्भातील मर्यादा दाखवतात आणि आंबेडकरवादाच्या सामाजिक परिवर्तनवादी शक्तीवर भर देतात. त्यांच्या मते भारतीय समाज समजून घेण्यासाठी जात आणि वर्ग या दोन्ही घटकांचा एकत्रित विचार आवश्यक आहे. या कादंबरीत महानगरातील अनेक स्तरांवरील विसंगती दिसतात. वेश्या, बेरोजगार युवक, झोपडपट्टीतील लोक, दलित तरुण आणि स्थलांतरित समाज यांच्या जीवनातील संघर्ष लेखकाने वास्तववादी पद्धतीने मांडले आहेत. त्यामुळे महानगर हे संधी आणि शोषण या दोन्हींचे केंद्र म्हणून समोर येते. जैनी ही या कादंबरीतील महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती वेश्याव्यवसायात अडकलेली असली तरी विचारशील आहे. शिक्षण, स्वातंत्र्य आणि सन्मानाचे जीवन जगण्याची तिची इच्छा आहे. तिच्या मनोगतातून अस्तित्ववाद, स्वातंत्र्य, अस्मिता, मानवी एकाकीपणा आणि स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे प्रश्न समोर येतात. राजा आणि जैनी यांच्या नात्यामधून प्रेम, शरीर, सत्ता, सामाजिक बंधने आणि मुक्ती यांचा तात्त्विक विचार व्यक्त होतो. त्यामुळे ही कादंबरी केवळ सामाजिक वास्तव मांडत नाही, तर मानवी नातेसंबंधांचेही सखोल विश्लेषण करते. निगेटिव्ह स्पेसमध्ये कथानकापेक्षा विचारप्रधान संवादांना अधिक महत्त्व आहे. तृतीयपुरुषी निवेदन, पात्रांची मनोगते, वैचारिक चर्चा, राजकीय विवरण आणि अनुभवकथन यांच्या साहाय्याने कादंबरीची रचना उभी राहते. या कादंबरीची भाषा बहुभाषिक आहे. या कादंबरीबद्दल रणधीर शिंदे म्हणतात की, "लघुकादंबरीचे स्वरूप असणाऱ्या या कादंबरीची रूपतत्त्वे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कवीची कादंबरी असल्यामुळे भाषा व आविष्कार रूपावर त्याचा परिणाम झालेला आहे. सबंध कादंबरीचे स्वरूप हे चर्चात्मक व विवरणात्मक आहे. तृतीयपुरुषी कथन व निवडक पात्रांच्या मनोगतांमधून कादंबरीची संरचना सिद्ध झाली आहे. राजकीय आशय प्रकट करण्यासाठी विवरणात्मक, विवेचनात्मक शैलीचा आधार घेतला आहे. बंबय्या मराठी भाषेचा वापर वेधक ठरला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

आहे. झोपडपट्टी, वस्त्यांमधील लुंपेन वर्गाचा बहुभाषिक नकाशा त्यामध्ये आहे. हिंदी, तसेच जातीय-वर्गीय समूहाची भाषा बोलीरूपे आहेत. हिंदी संवाद, हिंदी गझला, गाण्यांचे, कवितांचे मुखडे आहेत. कादंबरीतील जीवनाशयाचा महत्त्वाचा भाग असणाऱ्या अंडरवर्ल्ड जगाची भाषा आहे. अपरिचित भाषाचिन्हसृष्टी, त्यांची संकेतभाषा कादंबरीत आहे."[५] मराठी, हिंदी, उर्दू, बंबय्या बोली, अंडरवर्ल्डची सांकेतिक भाषा, राजकीय शब्दसंपदा आणि काव्यात्मक गद्य यांचा संगम येथे दिसतो. त्यामुळे ही भाषा महानगरीय जीवनाचे वास्तव प्रभावीपणे प्रतिबिंबित करते. हाडकी हाडवळा आणि निगेटिव्ह स्पेस या दोन्ही कादंबऱ्या वेगवेगळ्या सामाजिक अवकाशात घडतात. पहिली कादंबरी ग्रामीण दलित जीवनाचे चित्रण करते, तर दुसरी महानगरीय गुन्हेगारीविश्वाचे. पहिल्यात जातीय विषमता आणि स्त्रीशोषण केंद्रस्थानी आहे; तर दुसरीत राजकीय संघर्ष, गुन्हेगारी आणि वैचारिक द्वंद्व आहे. तरीही दोन्ही कादंबऱ्यांचा समान धागा म्हणजे अन्यायाविरुद्धचा प्रतिकार, मानवी स्वातंत्र्याचा आग्रह, दलित अस्मितेचा शोध आणि सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये भाषा ही केवळ माध्यम नसून सामाजिक अनुभवाची संरचना आहे. लोकभाषा, बोली, सांकेतिक शब्द आणि काव्यात्मक गद्य यांच्या साहाय्याने ढसाळ यांनी मराठी कादंबरीला नवी अभिव्यक्ती दिली आहे.

संदर्भ

1. ढसाळ नामदेव, लेखकाचे निवेदन, हाडकी हाडवळा, पुणे, अस्मिता प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९८१.
2. ढसाळ नामदेव, मुलाखत, अनुष्टुभ, जुलै,ऑगस्ट, ९७, पृ.६७.
3. शिंदे रणधीर, भारतीय साहित्याचे निर्माते नामदेव ढसाळ, प्रथम आवृत्ती, साहित्य अकादमी, २०२४, पृ. ६६,६७.
4. लोमटे आसाराम, हाडकी हाडवळा पुस्तक व आसाराम लोमटे, लोकसत्ता ऑनलाईन, २५ जून २०२३.
5. शिंदे रणधीर, उनि., पृ. ७२.